दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 92 ■ बुधवार, दि. 05 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

जीवनात सच्चेपणा राखा.



धामासाठी रश्मिकाने १२ तासांची शूटिंग शिफ्ट केली

आतील पान

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजला

## २४६ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायतींसाठी २ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला निकाल

**मुंबई/प्रतिनिधी :राज्यात गेल्या ४ वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल अखेर आज ४ नोव्हेंबर रोजी वाजला. त्यानुसार, राज्यात २ डिसेंबरला मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे, राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी याबाबतची घोषणा केली. त्यामुळे पुढील १ महिन्यात नगरपालिका निवडणुकांचा कार्यक्रम संपुष्टात येणार असल्याचे दिसून येते. १० नोव्हेंबरपासून उमेदवारांना उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असून १७ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना आपला उमेदवारी अर्ज दाखल करावा लागणार आहे. त्यामुळे, राजकीय पक्षांना पुढील ८ दिवसांत उमेदवारांची नावे निश्रि्चत करावी लागणार आहेत. दरम्यान, आजपासून, ४ नोव्हेंबरपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.**



### निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेतील १० मुद्दे

१. राज्य निवडणूक आयोगाने सांगितले की, ही पत्रकार परिषद नगरपरिषद आणि नगरपंचायत समित्यांबाबत आहेत, अशी माहिती आयोगाचे प्रमुख दिनेश वाघमारे यांनी दिली. त्यामुळे, महापालिका आणि जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुका कधी, असा प्रश्न्न उपस्थित झाला आहे.

२. राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायत समित्यांची निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. १४७ नगर पंचायतींपैकी ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका होत आहेत.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३७६ मतदार आहेत, त्यासाठी १३ हजार ३५५ मतदान केंद्र असणार आहेत. या निवडणुका देखील ईव्हीएमद्वारे होणार आहेत, अशी माहितीही आयोगाने दिली. तसेच,व्हीव्हीपॅटची सुविधा उपलब्ध नसणार, असेही स्पष्ट केले.

४. नगरपरिषदांसाठी सदस्य संख्या २० ते ७५ एवढी असून आयोगाने दिलेल्या खर्चानुसार, नगराध्यक्षपदासाठी १५ लाख खर्चाची मर्यादा असणार आहे, तर सदस्यांसाठी खर्च मर्यादा ही ७ लाख रुपये असणार आहे.

५. राज्यातील दुबार मतदाराबाबत राज्य निवडणूक आयोगाने दखल घेतल्याचे दिनेश वाघमारे यांनी सांगितलं. दुबार मतदारांच्या नावासमोर डबल स्टार असेल. दुबार मतदाराने प्रतिसाद न दिल्यास >>पान ३

## मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांत निवडणुकांचा फड

### ४८ नगरपरिषदा अन् ११ नगरपंचायतींसाठी होणार निवडणूक

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याच्या राजकारणात मराठवाड्याचं मोठं योगदान असून मराठवाड्यातील नेतेमंडळी मराठवाड्याच्या विकासासाठी नेहमी आग्रही असते. त्यामुळेच, मुख्यमंत्री कोणीही असो, मराठवाड्याच्या विकासासाकडे, आमदार, खासदारांकडे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वच राजकीय पक्षांचे विशेष लक्ष असते. लोकसभा निवडणुकीत ८ खासदार आणि विधानसभेला ४८ आमदार सभागृहात पाठवणाऱ्या मराठवाड्यात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजले आहेत. येथे ४८ नगरपरिषदा आणि ११ नगरपंचायतींसाठी निवडणूक होत आहे. तसेच, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महापालिकांचाही बिगुल वाजणार आहे.

मराठवाडा विभागातील संपूर्ण आठ जिल्ह्यात मिळून ४८ नगरपरिषदा आणि ११ नगरपंचायतींसाठी निवडणूक होत आहे. त्यामुळे, मराठवाड्यातील कोणत्या जिल्ह्यात किती नगरपरिषद आणि किती नगरपंचायतसाठी निवडणूक होत आहे, यासंदर्भाती माहिती खाली देण्यात आली आहे. मराठवाड्यातील ८ जिल्ह्यात >>पान ३

## पाकिस्तानला धूळ चारण्यासाठी १४ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीची टीम इंडियामध्ये एन्ट्री, १६ नोव्हेंबरला आशिया कपमध्ये भिडणार!

**मुंबई/प्रतिनिधी** : वुमेन्स टीम इंडियाने वनडे वर्ल्ड कपवर नाव कोरल्यानंतर आता आशिया कपसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. रायझिंग स्टार आशिया कपसाठी जितेश शम र्च्या नेतृत्वाखाली १४ वर्षांचा वैभव सूर्यवंशी पाकिस्तानविरुद्ध खेळणार आहे. बीसीसीआयने पाकिस्तानविरुद्ध आपली हुकमी एक्का उतरवला आहे. तसेच युवराज सिंगच्या तालमीतला तिसरा पैलवान देखील पाकिस्तानविरुद्ध उतरेल. १७ वर्षाच्या प्रियांश आर्याला याला आशिया कपमध्ये संधी देण्यात आली आहे.टीम इंडिया आरसीबीचा स्टार खेळाडू जितेश शर्मा याच्या नेतृत्वाखाली खेळेल. तर प्रियांश आर्य आणि वैभव सूर्यवंशी या दोन युवा खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. तसेच नमन धीर, सूर्यांश शेडगे, रमणदीप सिंग, हर्ष दुबे आणि आशुतोष शर्मा यांच्यावर फलंदाजीची जबाबदारी असेल. यश ठाकूर, गुरजपनीत सिंग, विजय कुमार व्यिश्क, युध्विर सिंग चरक यांच्यावर गोलंदाजीचा भार असणार आहे.

## तरुणांनो! तयारीला लागा, नवी मुंबईत पोलीस भरती सुरु; जागा किती?

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : नवी मुंबई पोलीस दलात नव्या भरतीची प्रक्रिया सुरु झाली आहे. पोलिस दलात सामील होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांसाठी ही सुवर्णसंधी ठरणार आहे. पात्र उमेदवारांनी अर्जाची प्रक्रिया आणि आवश्यक पात्रता लगेच जाणून घ्यावी.पोलीस आयुक्त कार्यालयाने एकूण ५२७ विविध पदांसाठी भरती जाहीर केली आहे. या भरतीत पोलीस शिपाई, चालक पोलीस शिपाई आणि बॅण्डस्मन या पदांचा समावेश आहे.सध्या नवी मुंबई पोलीस दलात अंदाजे ४५०० पोलीस कर्मचारी आणि ३५० अधिकारी कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विम ानतळामुळे स्वतंत्र विमानतळ पोलीस ठाणे आणि उलवा पोलीस ठाणे स्थापन करण्यात आली आहेत. त्याशिवाय अजून तीन नवीन पोलीस ठाण्यांचा विस्तारही होणार आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येनुसार पोलीस दलात अधिक मनुष्यबळाची गरज भासू लागली आहे.पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी तीन नवीन परिमंडळ रचना केल्यानंतर, शहरातील सुरक्षेचा स्तर वाढवण्यासाठी या भरतीची गरज असल्याचे सांगितले आहे. या भरतीमुळे नवी मुंबई पोलिसांचे सुरक्षा जाळे आणखी मजबूत होणार आहे.भरती प्रक्रियेनुसार पोलीस शिपाईच्या ४३९ जागा, चालक पोलीस शिपाईच्या ८२ जागा, आणि बॅण्डस्मनच्या ६ जागा उपलब्ध आहेत. सर्व पात्र उमेदवारांना ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले असून, अर्ज करण्याची शेवटची तारीख ३० नोव्हेंबर २०२५ अशी आहे.

## पुण्यात भोंदू बाबाने इंजिनिअर आणि शिक्षक पत्नीला १४ कोटीला फसवलं, इंग्लंडमधील घर, फार्महाऊस विकायला लावलं

**पुणे/प्रतिनिधी** : पुण्यात एका आयटी इंजिनिअर कोट्यावधी रुपयांची एका भोंदु बाबाने फसवणूक केल्याची माहिती समोर आली आहे. शंकर महाराज अंगात येतात आणि ते दुर्धर आजार बरे करतील असं सांगून पुण्यातील एका आयटी इंजीनीयरची तब्बल १४ कोटी रुपयांना एका भोंदु बाबाने फसवणूक केली आहे. दीपक डोळस नावाचे आयटी इंजीनियर आणि त्यांची शिक्षक पत्नी यांना भोंदू बाबाच्या सापळ्यात अडकून आपली आयुष्यभराची कमाई गमाऊन बसण्याची वेळ आली आहे. ज्यामध्ये डोळस यांच्या पुण्यातीलच नव्हे तर इंग्लंडमधील घराचा देखील समावेश आहे. या भोंदु बाबांचं नाव दीपक खडके असून या भोंदू बाबाला वेदिका पंढरपुरकर या त्याच्या शिष्येने फसवणूक करण्यात मदत केली आहे. वेदिकाच्या अंगात शंकर महाराज येतात आणि ते सांगतील तसं लागलं पाहिजे असा दावा करुन दीपक डोळस यांना त्यांच्या कोट्यावधींच्या मालमत्ता विकण्यास भाग पाडण्यात आलं. विशेष म्हणजे हे सर्व पैसे आरटीजीएसने दीपक खडके आणि वेदिका पंढरपुरकर यांनी त्यांच्या बँक खात्यांवर वळते करुन घेतले आहेत. २०१८ पासुन हा प्रकार सुरु होता.

## तुकाराम मुंढे यांचा मोठा निर्णय: अंमलबजावणी न केल्यास कारवाईचा इशारा

दैनिक आपला विदर्भ



**पुणे/प्रतिनिधी** : दिव्यांग आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सर्व मंत्रालयीन विभाग, स्वायत्त संस्था यांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांची माहिती तयार करून त्यांच्या विभागाच्या संकेतस्थळावर दर वर्षी १ जानेवारी रोजी प्रकाशित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच दिव्यांगांच्या रिक्त पदांचा आढावा घेऊन भरती प्रक्रिया राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, याबाबतची कार्यवाही न झाल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३४ अन्वये लाक्षणिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना शासनसेवेत दिव्यांगत्वाच्या आधारे निश्चित केलेल्या ५ गटांपैकी गट अ, ब, क साठी प्रत्येकी १ टक्का, गट ड आणि ई साठी १ टक्का याप्रमाणे ४ टक्के आरक्षण आहे. त्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ मे, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीमध्ये लाक्षणिक दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व संवर्गासाठी रिक्त पदांच्या ४ टक्के पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात आली आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट 'ड' ते गट 'अ' मधील निम्नस्तरापर्यंतच्या नियुक्तीस >>पान ३

## डॉलरच्या तुलनेत रूपयाची जबरदस्त वापसी थेट २१ पैशाने

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सकाळी एकदम सुरूवातीला रुपया विक्रमी नीचांकी पातळीवरून परतला असून रूपयाने डॉलरच्या तुलनेत विक्रमी वाढ नोंदवली आहे. सुरूवातीच्या आंतरराष्ट्रीय चलनाच्या खरेदी विक्रीत रूपया थेट २१ पैशांनी वधारून ८८.५६ प्रति डॉलरवर पोहोचला. विशेषत: परदेशात कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्यामुळे डॉलरच्या तुलनेत रुपया २१ पैशांनी वधारला आणि भांडवली बाजारातून परदेशी निधी बाहेर गेल्याने भारतीय चलनावर दबाव राहिला असे परकीय चलन व्यापाऱ्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

आंतरबँक परकीय चलन बाजारात, रुपया ८८.५५ वर उघडला आणि नंतर सुरुवातीच्या व्यवहारांमध्ये डॉलरच्या तुलनेत ८८.५६ वर व्यवहार करत होता, जो त्याच्या मागील बंद पातळीपेक्षा २१ पैशांनी जास्त पातळीवर खुला झाला आहे. सोमवारी, सलग तिसऱ्या सत्रात घसरण होत असलेला देशांतर्गत युनिट अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ७ पैशांनी कमी होऊन ८८.७७ वर बंद झाला, जो त्याच्या सर्वकालीन बंद पातळीजवळ होता.

प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, १४ ऑक्टोबर रोजी डॉलरच्या तुलनेत रुपयाने ८८.८१ ही आतापर्यंतची सर्वात कमी बंद पातळी नोंदवली होती.दरम्यान, सहा चलनांच्या तुलनेत डॉलरच्या ताकदीचे मोजमाप करणारा डॉलर निर्देशांक ०.०४ज्ञब वाढून ९९.७५ वर पोहोचला. आज सकाळी जागतिक तेल बेंचमार्क, ब्रेंट क्रूड, फ्युचर्स ट्रेडिंगमध्ये ०.३२ज्ञब घसरून ऱ्६४.६८ प्रति बॅरलवर पोहोचला होता.

देशांतर्गत शेअर बाजारात सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स ५५ अंकांनी घसरून ८३,९२३.४८ वर पोहोचला तर निफ्टी ४०.९५ अंकांनी घसरून २५,७२२.४० वर पोहोचला होता. एक्सचेंज प्रोविजनल डेटानुसार, सोमवारी परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी १८८३.७८ कोटी किमतीच्या शेअर्सची विक्री केली.

सोमवारी प्रसिद्ध झालेल्या मासिक सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की वस्तू आणि सेवा करात सवलत, उत्पादकता वाढ आणि तंत्रज्ञान गुंतवणुकीमुळे ऑक्टोबरमध्ये भारताच्या उत्पादन क्षेत्रातील क्रियाकलाप (अम्ग्र्ग्ब) मजबूत झाले आहेत. जरी आंतरराष्ट्रीय विक्री कमकुवत वेगाने वाढली असली तरीही ही वाढ झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले.

कालच प्रकाशित झालेल्या हंगामी समायोजित एचएसबीसी इंडिया मॅन्युफॅक्चरिंग परचेसिंग मॅनेजर्स इंडेक्स (इ्श्ह) सप्टेंबरमध्ये ५७.७ वरून ऑक्टोबरमध्ये ५९.२ वर पोहोचला होता.





## श्रीक्षेत्र संतपीठ, पैठण येथील मूलभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देणार

➤ उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मंत्री चंद्रकांतदादा पाटील

➤ संतपीठातील विकासासाठी लागणाऱ्या खर्चास तत्वत: मान्यता

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : समाजात संतांच्या विचारांचा, तत्त्वज्ञानाचा आणि मूल्याधिष्ठित जीवनशैलीचा प्रसार घडविण्यासाठी स्थापन केलेल्या श्रीक्षेत्र संतपीठ, पैठण येथील मूलभूत सुविधा उभारण्यासाठी लागणाऱ्या खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

आज मंत्रालयात मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली श्रीक्षेत्र संतपीठ, पैठण येथील मूलभूत सुविधांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला आमदार विलास भुमरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फ ुलारी, कुलसचिव प्रशांत अमृतकर, संतपीठाचे संचालक प्रवीण वक्ते, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, संतपीठाचे शैक्षणिक व्यवस्थापन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे पाच वर्षासाठी पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे .तसेच संतपीठात सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमासाठी अध्यपक -अध्यपकेत्तर कर्मचारी वेतन खर्चासाठी प्रतिवर्षी १ कोटी देण्यास मान्यतादेण्याचा निर्णय घेण्यात आला. भारतीय संतपरंपरा आणि लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन संतपीठाच्या माध्यमातून केले जात आहे. त्यामुळे



सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.असेही मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.

>>पान २

## गुरु नानक देव

आज कार्तिक पौर्णिमा, आज शीख समुदायाचे लोक श्री गुरू नानक देवजी यांचा जन्मोत्सव साजरा करतात. वास्तविक श्री गुरु नानक देवजी यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी झाला मात्र शीख धर्माचे अनुयायी त्यांचा जन्मोत्सव कार्तिक पौर्णिमेलाच साजरा करतात. गुरू नानक देवजी हे शीख धर्माचे संस्थापक व पहिले गुरु होते. गुरू नानक देवजी यांचा जन्म पाकिस्तानातील लाहोर जवळील तलवंडी येथे एका हिंदू कुटुंबात झाला. आजही या गावाला नानकना साहिब असे म्हणतात. गुरू नानक यांचा जन्मोत्सव प्रकाश पर्व म्हणूनही साजरा केला जातो. गुरू नानक देव लहानपणापासूनच धार्मिक वृत्तीचे होते मात्र कर्मकांड आणि बुरसटलेले विचार त्यांना मान्य नव्हते म्हणूनच त्यांनी मौजीबंधनाच्यावेळीच जानवे घालण्यास नकार दिला होता होता. हिंदू धर्मातील कर्मकांड, बुरसटलेले विचार, अनिष्ट चालीरीती, विषमता, जातीभेद, स्त्रियांना दिली जाणारी हिन वागणूक त्यांना मान्य नव्हती म्हणूनच ज्ञान प्राप्तीनंतर त्यांनी शीख धर्माची स्थापना केली. शीख धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी जगभर यात्रा काढली. या दरम्यान त्यांनी जगभरातील अनेक धार्मिक स्थळांना देखील भेटी दिल्या. त्यांनी त्या काळात केवळ भारतातीलच धार्मिक स्थळांना नव्हे तर इराक मधील बगदाद आणि सौदी अरेबियातील मक्का मदिना या धार्मिक स्थळांनाही भेटी दिल्या. या दरम्यान त्यांनी शीख धर्माच्या तत्वांचा प्रसार आणि प्रचार केला. सर्वसामान्यांमध्ये देव आणि धर्माबाबत जागृती निर्माण करण्यासोबतच त्यांनी हिंदू मुस्लिम एकतेचा संदेशही दिला. त्यांनी स्थापन केलेला शीख धर्म उदात्त, समतेच्या शिकवणुकीमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात रुजला. आज शीख धर्माचे अनुयायी केवळ आशिया खंडातच नाही तर युरोप आणि अमेरिका खंडातही आहे. जगातील प्रमुख धर्मा पैकी एक धर्म म्हणून शीख धर्म ओळखला जातो. गुरू नानक यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य आणि शाश्वत मूल्यांचे मूळ होते म्हणूनच जात धर्म यापलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र यावे, माणूस म्हणून एकत्र राहावे अशी त्यांची इच्छा होती. सर्व माणसे ही एकाच आईची लेकरे असून त्यांच्यात कोणीही उच्च नीच नाही असे ते मानत. जातीपाती मधील धर्मा धर्मामधील भेदभाव तर मान्य नव्हता. कोणीही हिंदू नाही, कोणीही मुसलमान नाही सर्व जण मानव आहोत असा नारा त्यांनी दिला. त्यांनी एकता, श्रद्धा आणि प्रेमाचे तत्वज्ञान मांडले. ते क्रांतिकारक विचारांचे होते. त्यांच्या विचारांमुळेच शीख धर्म साता समुद्रापार गेला. ७ सप्टेंबर १५३९ रोजी श्री गुरु नानक देवजी यांचे महानिर्वाण झाले. गुरू नानक देवजी यांना त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# सुलतानपुर येथील १०० खाटांच्या योग व निसर्गोपचार रुग्णालयाला राज्यशासनाने दिली २५ एकर शासकिय जमीन

## केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश, ४ नोव्हेंबर शासन निर्णय निर्गमित

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** लोणार तालुक्यातील सुलतानपुर येथे योग आणि निसर्गोपचार संशोधन परिषदेच्या अत्याधुनिक १०० खाटांच्या रुग्णालयास २५ एकर जमिन देण्याचा निर्णय महसुल व वनविभाग मंत्रालयाने घेतला आहे. त्या संदर्भातील शासन निर्णय ४ नोव्हेंबरला निर्गमित झाला असुन या निसर्गोपचार रुग्णालयाचा मार्ग सुकर झाला आहे. केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्यसरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत केले आहे.



जगप्रसिध्द पर्यटन स्थळी योग आणि निसर्गोपचार रुग्णालय उभारल्या गेले पाहिजे या दृष्टीकोनातुन योग आणि

बुलढाणा जिल्हयातील लोणार या निसर्गोपचार संशोधन संस्थेमार्फत केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाकडे मागणी करण्यात आली होती. दरम्यान हे योग आणि निसर्गोपचार रुग्णालय उभारणीसाठी राज्याच्या महसुल आणि वनविभागाकडे लोणार तालुक्यातील सुलतानपुर येथील गट नं.८८५ क्षेत्रातील २५ एकर जमिन देण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्यशासनाकडे बुलढाणा जिल्हा प्रशासनाच्या वतीने पाठविण्यात आला होता. त्यानंतर केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्यशासनाच्या महसुल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांची भेट घेऊन सदरहु जमिन योग व निसर्गोपचार रुग्णालयाला विनामुल्य देण्यासंदर्भात चर्चा केली होती.

जागतीक दर्जाच्या लोणार सरोवर परिसरामध्ये हे रुग्णालय उभारल्या गेल्यास त्याचा फायदा सर्वसामान्य जनतेला होईल हेही त्यांच्या निदर्शनास आणुन दिल्यानंतर या रुग्णालयाला जमिन देण्यासंदर्भातील सकारात्मकता राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांना भेटीदरम्यान दर्शविली होती. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी महसुल व वनविभाग मंत्रालयाच्या वतीने शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असुन यामध्ये बुलढाणा जिल्हयातील लोणार तालुक्यातील मौजे सुलतानपुर येथील शासकिय गट नं.८८५ एकुण क्षेत्रातील २९.६२ हेक्टर आर जमिनीपैकी २५ एकर जागा केंद्रिय योग आणि निसर्गोपचार संशोधन परिषदेच्या अत्याधुनिक १०० खाटांच्या रुग्णालय स्थापनेस (उभारण्यास) विनामुल्य जागा देण्याससंदर्भातील निर्णय सहाय्यक सचिव ज्ञा.ल.सुळ यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झाला आहे. त्यामुळे आता सुलतानपुर येथे उभारण्यात येणाऱ्या योग निसर्गोपचार रुग्णालय उभारणीला गती मिळणार असुन राज्यशासनाने जमिन उपलब्ध करुन दिल्याबद्दल केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्य शासनाचे आभार व्यक्त केले आहे.

# थामासाठी रश्मिकाने १२ तासांची शूटिंग शिफ्ट केली

**मुंबई/प्रतिनिधी :** आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदान्ना यांचा ''थामा'' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करत आहे. या चित्रपटाने १२ दिवसांत भारतात ११६ कोटींची कमाई केली आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य सरपोतदार यांनी अलीकडेच खुलासा केला की रश्मिकाने चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान कोणतीही तक्रार न करता सलग १२ तास काम केले.


कामाच्या वेळेबद्दल बोलताना आदित्य सरपोतदार म्हणाले, ''कधीकधी असे गृहीत धरले जाते की प्रत्येकजण २४ तास काम करेल, परंतु हे शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी नाही. माझा असा विश्वास आहे की शूटिंग दरम्यान १२ तासांची शिफ्ट योग्य आणि व्यावहारिक आहे. त्यापेक्षा जास्त काम करणे चुकीचे आहे. कधीकधी असे होते की लोकांना दोन वेळापत्रकांमध्ये घरी जाण्यासाठीही वेळ मिळत नाही, जे पूर्णपणे चुकीचे आहे.''

आदित्य पुढे म्हणाले की, दीपिकाची ८ तासांच्या शिफ्टची मागणी लोकांनी समजून घेतली पाहिजे. तो म्हणाला, ''एक अभिनेता म्हणून, कॅमेऱ्यासमोर चांगले दिसणे महत्त्वाचे आहे. ही मागणी कुठून आली आणि ती का केली जात आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. दीपिकाने हे सुरू केले आहे, म्हणून त्यामागील कारण समजून घेणे महत्त्वाचे आहे. विचार न करता विधाने करणे योग्य नाही.''दिग्दर्शक आदित्य सरपोतदार म्हणाले, ''जर तुम्ही एक अभिनेता असाल आणि तुम्हाला वाटत असेल की तुम्ही १२ तास पूर्ण उर्जेने काम करू शकता, चांगले दिसू शकता आणि तुमचे १०० टक्के देऊ शकता, तर का नाही? पण जर तुम्हाला वाटत असेल की ८ तास तुमच्यासाठी योग्य आहेत आणि तुम्ही त्यापेक्षा जास्त करू शकत नाही, तर तेही ठीक आहे. शेवटी, ही प्रत्येकाची वैयक्तिक निवड आहे.''एक उदाहरण देताना आदित्य म्हणाले, ''जेव्हा परेश रावल या चित्रपटात (थमा) सामील झाले तेव्हा त्यांना बरे वाटत नव्हते. एक वेळ अशी आली जेव्हा त्यांनी सांगितले की डॉक्टरांनी त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिल्यामुळे ते चित्रपट करू शकणार नाहीत. मग आम्ही म्हणालो, सर, आम्ही तुमचे काम कमी वेळेत पूर्ण करू. कलाकारांची काळजी घेणे ही आमची जबाबदारी आहे.''

रश्मिका दररोज १२ तास शूटिंग करायची: सरपोतदार

रश्मिकाबद्दल बोलताना आदित्य म्हणाले, ''रश्मिका दिवसाला १२ तास काम करायची. ती कधीच थकल्यासारखे म्हणाली नाही.'' कदाचित ती तिच्या कारकिर्दीच्या अशा टप्प्यावर असेल जेव्हा ती ते करू शकते, परंतु हा नियम सर्वांना लागू होऊ नये. माझा असा विश्वास आहे की अभिनेते आणि दिग्दर्शकांनी जर एखाद्या गोष्टीवर सहमत असतील तरच एकत्र काम करावे.''

# गुरु नानक देव : मानवता आणि सामाजिक समतेचे प्रवर्तक



भारतीय संत परंपरेत अनेक थोर पुरुषांनी समाजाच्या उद्धारासाठी कार्य केले, पण त्या परंपरेतील सर्वात तेजस्वी आणि मानवतेचा खरा दीपस्तंभ म्हणजे गुरु नानक देव होते. त्यांनी धर्माला पंथ, जाती, विधी यांच्यापलीकडे नेऊन तो समाजकल्याणाशी जोडला. त्यांच्या विचारसरणीत माणुसकी, समानता, सेवा, प्रेम, श्रमसन्मान आणि न्याय यांचे अद्भुत मिश्रण आहे. त्यांचे जीवन हे केवळ धार्मिक क्रांतीचे नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचे घोषणापत्र ठरले. आजच्या काळातही त्यांची शिकवण समाजाला नवा नैतिक मार्ग दाखवते. गुरु नानक देव यांचा जन्म तळवंडी या गावात झाला, ज्याला आज ननकाना साहिब (पाकिस्तान) म्हणून ओळखले जाते. त्या काळात भारतीय समाज धर्माच्या नावाखाली विभागला गेला होता. जातिभेद, अंधश्रद्धा, स्त्रीदमन, शोषण आणि असमानता यांचे सावट संपूर्ण समाजावर पसरलेले होते. धर्म हा व्यवहाराच्या केंद्रस्थानी होता, पण त्याचा वापर लोकशोषणासाठी होत होता. अशा वेळी एका बालकाने समाजाला सांगितले की 'ना को हिंदू, ना को मुसलमान' म्हणजेच प्रत्येक मनुष्य सर्वप्रथम एक मानव आहे. हे वचन त्या काळातील धार्मिक संकुचिततेवर प्रहार करणारे आणि समाजाला नव्या दिशेने नेणारे होते.

गुरु नानक देव यांचे बालपण शांत, करुणामय आणि चिंतनशील वातावरणात गेले. लहानपणापासूनच त्यांना सामाजिक अन्याय, गरीबी, आणि धर्माच्या नावाखाली होणारे अत्याचार जाणवले. त्यांनी देवाला शोधण्याची प्रक्रिया बाह्य पूजापद्धतीत नव्हे, तर अंत:करणातील शुद्धतेत शोधली. त्यांनी धर्माला मनुष्याच्या आचरणाशी जोडले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे सत्याचा शोध, इतरांविषयी करुणा, प्रामाणिक श्रम आणि सामूहिक कल्याणासाठीची सेवा होय. त्यांची मूलभूत शिकवण तीन शब्दांत सांगता येते ते म्हणजेच नाम जपो, किरत करो आणि वंड छको. या तत्त्वांमध्ये समाजजीवनाची संपूर्ण दिशा अंतर्भूत आहे. नाम जपो म्हणजे सतत सत्य आणि परमात्म्याचे स्मरण, म्हणजेच अंत:करणातील शुद्धता; किरत करो म्हणजे प्रामाणिक श्रम करा, म्हणजेच जीवनात परिश्रम आणि स्वावलंबनाचा सन्मान करा; तर वंड छको म्हणजे आपल्या उत्पन्नातील काही भाग इतरांसोबत वाटून घ्या, म्हणजेच समाजातील दुर्बल घटकांविषयी जबाबदारी बाळगा. या शिकवणुकीत आर्थिक समता, सामाजिक न्याय आणि नैतिकतेचा सुंदर संगम दिसतो. हे तीन तत्त्व आजच्या समाजातही तितकेच उपयुक्त आहेत.

गुरु नानक देव यांनी समाजातील जातिभेदाचा तीव्र निषेध केला. त्यांच्या काळात समाजात 'उच्च' आणि 'नीच' यांच्यातील दरी फारच खोल होती. अस्पृश्यतेने माणसामाणसात भिंती उभ्या केल्या होत्या. पण त्यांनी शिकवले की 'सब मे जोत, जोत है सोई; तिस का चानण सब मे होई.' म्हणजे प्रत्येक जीवामध्ये त्या एकाच देवाची ज्योत आहे. त्यामुळे कोणताही भेदभाव चुकीचा आहे. ही विचारसरणी सामाजिक समतेचे मूलतत्त्व ठरली. त्यांनी देवाच्या कृपेचे दरवाजे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या दृष्टीने प्रत्येक मनुष्य प्राणी मग तो कुणीही असो परमेश्वराचा अंश आहे. त्यांच्या कार्यातील सर्वात प्रभावी आणि क्रांतिकारी कल्पना म्हणजे 'लंगर' होय. सामूहिक भोजनाची परंपरा, लंगरात सर्व धर्म, जाती, स्त्री-पुरुष एकत्र बसून एकसमान पद्धतीने जेवतात. लंगर हे केवळ अन्नदान नाही, तर सामाजिक समतेचे सशक्त प्रतीक आहे. या उपक्रमातून त्यांनी उच्चनीचतेची भिंत पाडली आणि सामाजिक ऐक्य निर्माण केले. आजही जगभरातील गुरुद्वारांमध्ये चालणारा लंगर हा मानवतेचा, सेवाभावाचा आणि समतेचा जिवंत वारसा आहे.

गुरु नानक देव यांनी धर्माच्या नावाखाली होणाऱ्या ढोंगीपणाला व पाखंडाला आव्हान दिले. त्या काळातील धार्मिक नेते लोकांना देवाची भीती दाखवून त्यांच्या श्रमावर जगत होते. त्यांनी स्पष्ट सांगितले की, देवाला प्रसन्न करण्यासाठी दान, यज्ञ, हवन, आडंबराची आवश्यकता नाही; खरा धर्म म्हणजे प्रामाणिक आचरण, करुणा, आणि सत्याशी निष्ठा होय. त्यांनी धर्माचा अर्थ पुन्हा परिभाषित केला. 'धर्म हा माणसाला माणसाशी जोडणारा बंध आहे, विभाजक नव्हे.' त्यांनी धर्माला सामाजिक नैतिकतेचा पाया बनवला. गुरु नानक देव हे स्त्रीसमानतेचेही प्रवर्तक होते. त्या काळात स्त्रियांना समाजात कनिष्ठ स्थान होते. पण त्यांनी ठामपणे सांगितले की 'सो क्यों मंदा आखिए, जित जमे राजान.' म्हणजे जी स्त्री राजांना जन्म देते, ती कशी कनिष्ठ असू शकते? त्यांनी स्त्रियांना समाजातील समान स्थान देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांच्या विचारांमुळे पुढे शीख धर्मात स्त्रियांना धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मान्यता मिळाली. हे त्या काळातील समाजासाठी अत्यंत प्रगतिशील विचार होते. त्यांनी 'सेवा' या तत्त्वावर आधारलेली एक संस्कृती निर्माण केली. त्यांच्या मते, 'ईश्वराची सेवा म्हणजे मनुष्य प्राण्याची सेवा होय. त्यांनी गरीब, वंचित, पीडित यांच्यासाठी कार्य करणे हेच धर्माचे खरे सार मानले. त्यांनी सांगितले की, समाजातील दु:ख कमी करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या सामर्थ्याने योगदान दिले पाहिजे. या सेवाभावातूनच शीख धर्मातील 'सेवा' आणि 'संगत' या दोन संकल्पना निर्माण झाल्या. संगत म्हणजे सामूहिक प्रार्थना आणि सहजीवनाचा भाव, तर सेवा म्हणजे नि:स्वार्थपणे कार्य करणे. या दोन्ही कल्पनांनी समाजात बंधुभाव आणि सहकार्याचे वातावरण निर्माण केले.

गुरु नानक देव यांनी समाजात श्रमाचा सन्मान वाढवला. त्यांनी सांगितले की 'घाळ खाए किछ हातहु दे, नानक राहु पछाणे से.' म्हणजे जो स्वत: परिश्रम करतो आणि इतरांना देतो, तोच योग्य मार्ग ओळखतो. त्या काळात श्रम करणाऱ्यांना समाजात नीच मानले जात होते, पण त्यांनी सांगितले की श्रम म्हणजेच साधना. या विचारांनी श्रमिक वर्गाला आत्मसन्मान आणि सामाजिक प्रतिष्ठा दिली. त्यांनी समाजाला शिकवले की परिश्रमाशिवाय अध्यात्म शक्य नाही. गुरु नानक देव यांनी आपल्या जीवनात चार प्रमुख प्रवास केले. भारताच्या विविध भागांपासून ते अरब, तिबेट, श्रीलंका, चीनपर्यंत. या प्रवासांमध्ये त्यांनी विविध धर्म, पंथ, आणि संस्कृतींच्या लोकांशी संवाद साधला. त्यांनी सर्व धर्मांच्या श्रेष्ठ तत्त्वांना मान्यता दिली आणि सर्वांमध्ये एकतेचा संदेश दिला. त्यांनी सांगितले की सत्य आणि प्रेम हाच प्रत्येक धर्माचा मूळ गाभा आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये सर्वधर्मसमभावाचे अधिष्ठान आहे. त्यांचे तत्त्वज्ञान समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर, ते 'समावेशक समाजरचना' ( ) निर्माण करण्याचा आराखडा होते. त्यांनी सांगितले की समाज हे धर्म, जात, लिंग या आधारांवर नव्हे, तर समानता, सहकार्य, आणि न्याय या मूल्यांवर उभे राहिले पाहिजे. त्यांनी व्यक्तीच्या आणि समाजाच्या नैतिक जबाबदाऱ्या अधोरेखित केल्या. त्यांनी धर्म आणि समाज यांचा मेळ घालून एक सामाजिक चळवळ निर्माण केली. त्यांच्या शिकवणीत आर्थिक न्याय या संकल्पनेलाही महत्त्व आहे. त्यांनी श्रीमंत-गरीब यांच्यातील विषमता नाकारली आणि 'वंड छको' या तत्त्वाद्वारे संपत्तीचे समान वाटप करण्याचा संदेश दिला. त्यांनी लोभ, स्वार्थ आणि शोषणाला पाप ठरवले. त्यांच्या विचारांमध्ये सामूहिक समृद्धीची कल्पना आहे. आजच्या काळातील 'सामाजिक समता' आणि 'आर्थिक न्याय' या संकल्पना त्यांच्या शिकवणीशी पूर्णपणे सुसंगत दिसतात.

गुरु नानक देव यांची समाजदृष्टी सर्वसमावेशक, वैज्ञानिक आणि आधुनिक होती. त्यांनी शिक्षण, आत्मविकास, सत्यशोधन आणि सामाजिक जबाबदारी यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणीय समतोलाचाही गाभा आहे. त्यांनी सांगितले की 'हवा गुरु, पाणी पिता, माता धरत महत.' म्हणजे निसर्गातील प्रत्येक घटक आपला नातेवाईक आहे. त्यामुळे निसर्गाचा सन्मान करणे हेही धर्माचेच रूप आहे. आजच्या युगात, जेव्हा समाजात असहिष्णुता, भेदभाव, धार्मिक दुरावा आणि नैतिक अध:पतन वाढले आहे, तेव्हा गुरु नानक देव यांचे तत्त्वज्ञान अधिकच अर्थपूर्ण वाटते. त्यांनी दाखवलेला मार्ग केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक पुनर्जागरणाचा आहे. त्यांनी माणसामाणसात प्रेम आणि सहकार्याची भावना निर्माण केली. त्यांनी सांगितले की समाजाचा खरा विकास तेव्हाच शक्य आहे, जेव्हा प्रत्येक व्यक्ती इतरांसाठी जगते आणि इतरांच्या हितासाठी कार्य करते. गुरु नानक देव जयंती म्हणजे केवळ धार्मिक सण नाही, तर मानवतेच्या पुनरुज्जीवनाचा दिवस आहे. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, धर्माचा सार माणसाच्या कल्याणात आहे, विधी-विधानात नव्हे. त्यांनी दिलेले 'नाम, किरत, वंड' हे त्रिसूत्र आजही समाजजीवनाचे दिशा-तत्त्व ठरू शकते. त्यांनी शिकवले की समाजात एकमेकांविषयी आदर, प्रेम, समानता आणि करुणा हीच खरी ईश्वरभक्ती आहे.

शेवटी असे म्हणता येईल की गुरु नानक देव हे केवळ शीख धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर ते मानवतेचे जागतिक प्रवक्ते होते. त्यांनी दाखवलेला मार्ग कालातीत आहे, जो प्रत्येक माणसाला स्वत:च्या अंत:करणाशी जोडतो आणि समाजाशी नाते घट्ट करतो. त्यांचे विचार आजही समाजाच्या आत्म्याला नवी ऊर्जा देतात. त्यांच्या शिकवणुकीचा अर्थ असा की, माणूस हेच देवाचे सर्वश्रेष्ठ रूप आहे. म्हणूनच गुरु नानक देव जयंती साजरी करणे म्हणजे त्यांच्या तत्त्वांचा अंगीकार करून समाजात प्रेम, समानता आणि सेवा या मूल्यांचा पुनः प्रकाश प्रज्वलित करणे होय.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलढाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलढाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर तिघांचा अत्याचार, ५ तास डांबून तोडले लचके, नराधमांचं एन्काऊंटर

कोइम्बतूर : एका कॉलेजच्या तरुणीवर तीन जणांनी सामूहिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पीडित तरुणी आपल्या एका मित्रासोबत फिरायला गेली होती. ती विमानतळ परिसरात असताना तीन नराधमांनी त्यांचा पाठलाग केला. हल्लेखोरांनी पीडितेच्या मित्राला बेदम मारहाण करत बेशुद्ध पाडलं. यानंतर नराधमांनी पीडितेला कारमधून ओढून नेत तिच्यावर आळीपाळीने अत्याचार केला. अत्याचाराची ही घटना उघडकीस येताच संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने शोध मोहिम राबवत आरोपींची ओळख पटवली आणि त्यांचं एन्काऊंटर केलं आहे. तिघांच्या पायाला गोळ्या लागल्या असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. थावसी, कार्तिक आणि कालीस्वरन अशी नराधम आरोपींची नावं आहेत. तिघांनी रविवारी रात्री उशिरा तरुणीवर अत्याचार केला होता. मंगळवारी पहाटे त्यांना पोलीस पकडायला गेले असता, त्यांनी पोलिसांवर हल्ला केला. यावेळी झालेल्या चकमकीत तिन्ही आरोपी जखमी झाले.

ही घटना तामिळनाडूतील कोइम्बतूर विमानतळावर घडली आहे. घटनेच्या दिवशी पीडित तरुणी आपल्या एका मित्रासह फिरायला गेली होती. यावेळी तिन्ही आरोपींनी चोरीच्या दुचाकीवरून येत दगडाने कारवर हल्ला केला. यानंतर त्यांनी पीडितेच्या मित्राला बेदम मारहाण केली. मित्र बेशुद्ध पडल्यानंतर त्यांनी तरुणीला ओढत आडबाजुला नेलं. तिथे तिघांनी आळीपाळीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. आरोपींनी तब्बल पाच तास डांबून तिचे लचके तोडले. यानंतर पहाटे सर्व आरोपी फरार झाले.

या सामूहिक अत्याचाराच्या घटनेनंतर, पोलिसांनी तपासासाठी सात विशेष पथके तयार केली. पीडितेचे अपहरण झालेल्या ठिकाणापासून सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी तिन्ही आरोपींची ओळख पटवली. यावेळी तिन्ही आरोपी उपनगरातील कोइम्बतूरच्या वेल्लैकानार भागात लपले असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे पोलीस आरोपींना अटक करण्यासाठी पोहोचले असता त्यांनी धारदार शस्त्रांनी हल्ला केला, ज्यामध्ये कॉन्स्टेबल चंद्रशेखर जखमी झाला.

यावेळी पोलिसांनी प्रत्युत्तरात गोळीबार केला, तिन्ही आरोपींना पायात मारले आणि त्यांना ताबडतोब अटक केली. तिन्ही आरोपींना पहाटे ३:०० वाजता कोइम्बतूर सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिन्ही आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी राहिली आहे. पोलीस घटनेचा अधिक तपास करत आहेत.

### कृषी क्षेत्रावरुन फडफड करणाऱ्या अमेरिकेच्या नांग्या ठेचल्या, भारताने दिलं सणसणीत उत्तर

नवी दिल्ली : अमेरिका आणि चीनमधील व्यापार तणाव पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. अमेरिकेच्या कृषी सचिव ब्रुक रोलिन्स यांच्या वक्तव्यामुळे वादाची ठिणगी पडली आहे. त्यांनी दावा केला की ''अमेरिका जगाला अन्न पुरवते'', मात्र हा दावा भारताचे माजी परराष्ट्र सचिव कंवल सिब्बल यांनी थेट फेटाळून लावला आहे.

सिब्बल यांनी सोशल मीडिया प्लॅटफफॉर्मं (माजी ट्विटर) वर पोस्ट करत रोलिन्स यांच्या दाव्याला प्रत्युत्तर दिले आणि जगातील अग्रगण्य कृषी उत्पादक देशांची यादी प्रसिद्ध केली. त्यांनी म्हटले की, ''अमेरिका नक्कीच एक मोठा कृषी उत्पादक देश आहे, पण ती जगाला अन्न पुरवते असा दावा हास्यास्पद आहे.''

सिब्बल यांचे प्रत्युत्तर

सिब्बल यांनी प्रसिद्ध केलेल्या यादीत चीन, अमेरिका, भारत, ब्राझील, रशिया, फ्रान्स, मेक्सिको, जपान, जर्मनी आणि तुर्की यांचा समावेश आहे. त्यांनी स्पष्ट केलं की चीन सध्या जगातील सर्वात मोठा कृषी उत्पादक देश आहे. सिब्बल म्हणाले, ''कोणत्या मूर्खाने अमेरिकन कृषी सचिवांना अशी माहिती दिली की अमेरिका जगाला अन्न पुरवते?'' असंही ते म्हणाले

जगातील सर्वात मोठे कृषी निर्यातदार देश युरोपियन युनियन, अमेरिका, ब्राझील, चीन, कॅनडा, थायलंड, भारत, मेक्सिको आणि ऑस्ट्रेलिया आहेत. चुकीच्या माहितीद्वारे निर्माण होणारा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे.असं सिब्बल यांनी नमूद केले.

वादाची सुरुवात कशी झाली?

वादाची सुरुवात तेव्हा झाली जेव्हा रोलिन्स यांनी अमेरिकन सोयाबीन शेतकऱ्यांबद्दल भाष्य करताना चीनवर टीका केली. त्यांनी म्हटले की चीनने व्यापार चर्चेदरम्यान अमेरिकन सोयाबीन खरेदीला दबावाचे शस्त्र बनवले आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा सोयाबीन खरेदीदार देश आहे आणि अमेरिकन शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची बाजारपेठ आहे.

अमेरिकेने लादलेल्या परस्पर शुल्कांनंतर चीनने सोयाबीनवर २३ज्ञब आयात कर लावला होता. यामुळे चीनने अमेरिकेकडून सोयाबीन खरेदी कमी करून दक्षिण अमेरिकन देशांकडून आयात वाढवली. तथापि, अलीकडच्या चर्चांमध्ये बीजिंगने जानेवारीपर्यंत १२ दशलक्ष टन अमेरिकन सोयाबीन खरेदी करण्यास सहमती दर्शविली आहे.ब्रुक रोलिन्स यांनी ठामपणे सांगितले की, ''चीनला अमेरिकन शेतकऱ्यांचा प्यादे म्हणून वापर करण्याची परवानगी दिली जाणार नाही. आमचे शेतकरी जगाचे पोषण करतात आणि त्यांना ट्रम्पसारखा नेता आवश्यक आहे, जो त्यांच्या स्वातंत्र्यासाठी लढेल.'' असंही त्यांनी म्हंटले आहे.

# राज्य मंत्रिमंडळाचे २१ मोठे निर्णय; राष्ट्रीय आरोग्य अभियानात १० वर्ष पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमित पदावर होणार समायोजन

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची कॅबिनेट बैठक आज संपन्न झाली. आजच्या बैठकीत काही मुद्द्यांवरुन चांगलीच खडाजंगी झाल्याची माहिती आहे. मात्र, आजच्या बैठकीत २१ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, सार्वजनिक आरोग्य विभागाने महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेत विविध प्रकारच्या २४०० आजारांसाठी मान्यता देण्यात आली असून २३९९ आजारांसाठी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार होणार आहेत. तर, ज्या काही गंभीर आजारांसाठी अधिकचा खर्च होत आहे, त्यात १० लाख रुपये देण्याचा निर्णयही शासनाने घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

मंत्रिमंडळ बैठकीत आज पुन्हा मंत्र्यांनी प्रशासनाला धारेवर धरले, अजूनही पीडित शेतकऱ्यांना हवी तशी आणि हव्या त्या वेगाने मदत दिली जात नसल्याने अनेक वरिष्ठ मंत्री नाराज असल्याचं पाहायला मिळालं. शिवसेना आणि भाजपच्या मंत्र्यांनी कॅबिनेट बैठकीत नाराजी व्यक्त केली. मागील कॅबिनेटमध्ये देखील अशीच नाराजी व्यक्त केल्याने मुख्यमंत्री यांनी प्रशासनाला खडसावले होते. मात्र, आजच्या कॅबिनेटमध्ये पुन्हा मदत पोहोचली नसल्याची तक्रार काही मंत्र्यांनी केली, फक्त मराठवाड्यात नाही तर कोकणात देखील भात पिकाचे मोठे नुकसान झाल्याचे कोकणातील सेना-भाजपच्या मंत्र्यांनी सांगितले, तिथे देखील मदत देण्याचे प्रशासनाला निर्देश बैठकीत देण्यात आले आहेत.

**मंत्रिमंडळ बैठकीतील २१ निर्णय**

**सार्वजनिक बांधकाम विभाग)**

विरार ते अलिबाग बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या कर्जास शासन हमी देण्यास मान्यता. हुडको कडून घेण्यात येणारे हे कर्ज महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चासाठी वापरणार आहे.

**(उच्च व तंत्रशिक्षण विभाग)**

नागपूर येथील लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विद्यापीठास निधी देण्यास मान्यता. सन २०२५-२०२६ ते सन २०२९-२०३० या कालावधीकरीता दरवर्षी ७ कोटी रुपयांचा निधी चार हप्त्यात वितरीत करण्यात येणार. संस्था १९४२ मध्ये स्थापन झालेली ही संस्था रसायन तंत्रज्ञान क्षेत्रात नावाजलेली संस्था.

**(महसूल विभाग)**

सोलापूर जिल्ह्यातील मौजे कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथील असंघटित कामगारांच्या प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या ३० हजार घरांच्या गृहप्रकल्पास अनर्जित रक्कम, नजराणा रक्कम व अकृषिक करातून सवलत देण्यास मान्यता.

**(महसूल विभाग)**

वाशिम जिल्ह्यातील मौजे वाईगोळ (ता.मानोरा) येथील मधील १.५२ हे.आर. जागा ग्रामपंचायत, वाईगौळ यांना भक्त निवास व यात्रेकरूंसाठीच्या सोयी-सुविधा उभारण्याकरिता विनामूल्य देण्यास मान्यता.

**(विधि व न्याय विभाग)**

पुणे जिल्ह्यात घोडनदी (शिरुर) येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालय यांची स्थापना होणार. त्यासाठी आवश्यक पद निर्मितीस मान्यता.

**(विधि व न्याय विभाग)**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय होणार. त्यासाठी आवश्यक न्यायीक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पद निर्मितीस मान्यता.

(वित्त विभाग)

राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी MAHA ARC LIMITED बंद करण्यास मंजुरी. केंद्राच्या नॅशनल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीची स्थापन केली होती, त्याच धर्तीवर राज्य कंपनीची स्थापना सप्टेंबर २०२२ मध्ये स्थापन करण्यात आली होती. भारतीय रिझर्व्ह बँकेने २०२३ मध्ये या कंपनीला परवाना नाकारल्याने, कायदेशीर दृष्ट्या या कंपनीला कामकाज पाहणे शक्य नसल्याने, कंपनी बंद करण्याचा निर्णय.

**(ग्राम विकास विभाग)**

ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन देण्यासाठी असलेल्या कर वसुलीच्या अटीत सुधारणा. कर्मचाऱ्यांना दिलासा.

**(मत्स्यव्यवसाय विभाग)**

मत्स्यव्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्यात आल्याने मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना बँकाकडून देण्यात येणाऱ्या अल्प मुदतीच्या खेळत्या भांडवलाच्या कर्जावर ४ टक्के व्याज परतावा देण्यास मान्यता.

**(अल्पसंख्याक विकास विभाग)**

हिंद-की-चादर श्री. गुरुतेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रमास आवश्यक निधीस मान्यता. नांदेड, नागपूर आणि रायगड जिल्ह्यांतर्गत राज्यभरातील विविध ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी ९४ कोटी ३५ लाख ६४ हजार रुपयांच्या निधीच्या तरतुदीस मान्यता.

**(सामान्य प्रशासन विभाग)**

प्रस्तावित महाराष्ट्र जनविश्र्वास अध्यादेश, २०२५ मधील तरतुदीमधील सुधारणांना मान्यता.

**(महसूल विभाग)**

जमीन मुंबई उपनगर जिल्हातील मौजे वांद्रे ( ता. अंधेरी) येथील ३० वर्ष कालावधीसाठी एक रुपया नाममाफ वार्षिक भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या ६४८ चौ.मी. शासकीय जमिनीसमोरील ३९५ चौ.मी. भुखंडावर आवश्यक अन्य सोयी-सुविधा पुरविण्यास मान्यता.

**(महसूल विभाग)**

अकृषिक कर आकारणी तसेच जमिनीच्या अकृषिक वापराच्या परवानगी व सनदेबाबतच्या तरतुदींमधील सुधारणांना मान्यता. त्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्यात येणार

**(सार्वजनिक आरोग्य विभाग)**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या विस्तारीत योजनेअंतर्गत आयुष्मान कार्ड निर्माण व वितरण करणाऱ्या क्षेत्रिय स्तरावरील कर्मचा-यांच्या (त्रीपीं डळपश थींज्ञशीी) मानधनात वाढ करण्यास मंजुरी.

**(सार्वजनिक आरोग्य विभाग)**

राज्यातील नागरिकांना आरोग्य सुविधा आणि चांगले उपचार व्हावेत यासाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचारांच्या यादीत सुधारणा करण्यास मान्यता.

**(सार्वजनिक आरोग्य विभाग)**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करणार. आरोग्य सुविधांचे विकेंद्रीकरणामुळे नागरिकांना दिलासा.

**(नियोजन विभाग)**

परशुराम आर्थिक विकास महामंडळ, वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ व श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांना मंजुरी.

**(वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग)**

बारामती येथील पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सहयोगी प्राध्यापकांची पाच पदे निर्माण करण्यास मान्यता. त्यासाठी आवश्यक खर्चाच्या तरतुदीस मंजुरी.

**(नगरविकास विभाग)**

वर्धा शहरातील रामनगर येथील भाडेपट्ट्याने दिलेल्या भूखंडधारकाला निवासी भूखंड कायमस्वरुपी मालकी हक्काने देण्यास मंजुरी

**(सार्वजनिक आरोग्य विभाग)**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमित पदावर समायोजन करण्याच्या निर्णयात दुरुस्तीस मान्यता. अभियानात १४ मार्च २०२४ रोजी दहा वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्चाऱ्यांचे समकक्ष पदाव समायोजन. सेवा प्रवेश नियमांत दुरूस्ती न एक वेळची बाब म्हणून समायोजन केले जाणार. सार्वनजिक आरोगय विभागातील पदांबरोबर, ग्रामविकास विभागामार्फत भरण्यात येणारी आरोग्य सेवेतील रिक्त पदांबाबतचा निर्णय.

**(उच्च व तंत्रशिक्षण विभाग)**

चंद्रपूर जिल्हयातील मुल येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन पदविका अभियांत्रिकी शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्यात येणार. त्यासाठी आवश्यक ३९ शिक्षक व ४२ शिक्षकेतर पदांना व त्यासाठीच्या खर्चाच्या तरतुदीस मान्यता.

पान १ वरून...

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

नाव रद्द होईल. अधिकारी संपर्क साधून एक नाव रद्द करतील, तसेच इतर कोणत्या ठिकाणी मतदान केले नाही, असे डिक्लेरेशन मतदाराकडून घेतले जाईल.

६. मतदारांच्या सोयीसाठी नवीन ॲप देखील निवडणूक आयोगाने सुरू केलं आहे. त्यामुळे, मतदारांना डिजिटल पद्धतीने आपलं नाव मतदार यादीत शोधणे सहज शक्य होणार आहे.

७. राज्यातील निवडणुकांमध्ये मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी ३२ कॅम्पेन्स

राबवल्या जाणार आहेत, दिव्यांग मतदार, तान्या बाळासहच्या स्त्रिया, ज्येष्ठांना मतदानात प्राधान्य देण्यात येईल. तर, काही मतदार केंद्र गुलाबी असतील, त्यात सर्व अधिकारी महिला असणार आहेत.

८. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्रात ही आचारसंहिता लागू असली तरी अन्य ठिकाणीदेखील नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शासनाला नगरपरिषदा व नगरपंचींच्या कार्यक्षेत्राशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. आचारसंहिता आणि कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने आजच (ता. ४ नोव्हेंबर २०२५) दोन स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.

९. मतदान केंद्रावरील सुविधा - मतदान केंद्रावर दिव्यांग, तान्ह्याबाळासह असणाऱ्या स्त्रिया, गरोदर स्त्रिया, ज्येष्ठ नागरिक आदींना प्राधान्याने मतदान करून दिले जाईल. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदान केंद्रावर कायमस्वरुपी रॅम्पची व्यवस्था नसल्यास तात्पूर्ती सुविधा उभारली जाईल. व्हिलचेअरचीही व्यवस्था असेल. मतदान केंद्रावर विजेची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची, सावलीची सुविधा, शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. संबंधित ठिकाणी कुष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह / आश्रम असल्यास त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्र उभारण्यास हरकत नसेल. तिथे उपलब्धतेनुसार डॉक्टरांची नेमणूक केली जाईल. सर्व मतदान केंद्रांमध्ये किमान सुविधा असणे आवश्यकचे असेल; परंतु शक्य असेल तिथे आदर्श मतदान केंद्र उभारण्याचा प्रयत्न असेल. महिला मतदारांची संख्या जास्त असलेल्या ठिकाणी सर्व निवडणूक अधिकारी-कर्मचारी आणि पोलिस कर्मचारी महिला असतील, असे मतदान केंद्र 'पिंक मतदान केंद्र' म्हणून ओळखले जाईल. मतदान केंद्राच्या आत मतदारांना मोबाईल दूरध्वनी नेण्यास बंदी असेल. मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये; परंतु मतदान केंद्राच्या बाहेर मतदारांना मोबाईल दूरध्वनी जमा करण्यासाठी शक्य तिथे कक्ष असेल.

१०. मनुष्यबळाची व्यवस्था - नगरपरिषद व नगरपंचायतींच्या या निवडणुकांसाठी २८८ निवडणूक निर्णय अधिकारी आणि २८८ सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आवश्यकता असून, त्याची पूर्तता करण्यात आली आहे. साधारणतः सुमारे ६६,७७५ इतक्या निवडणूक अधिकारी कर्मचाऱ्यांची गरज भासेल, तीदेखील व्यवस्था झाली आहे. महसूल विभागीय आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक मनुष्यबळाबाबत निर्देश देण्यात आले आहेत. राज्याच्या मुख्य सचिवांसोबतदेखील बैठकी आयोजित करून मनुष्यबळाबाबत नियोजन केले आहे.

**असे असेल निवडणुकीचे टाईमटेबल**

नामनिर्देशन पत्र - १० नोव्हेंबर, अंतिम मुदत - १७ नोव्हेंबर, छाननी - १८ नोव्हेंबर, अर्ज माघारी घेण्याची तारीख - २१ नोव्हेंबर, निवडणूक चिन्ह वाटप - २६ नोव्हेबर, मतदान - २ डिसेंबर, निकाल - ३ डिसेंबर, विभागनिहाय, नगरपरिषद-नगरपंचायती, निवडणूक, कोकण - २७, नाशिक -४९, पुणे - ६०, संभाजीनगर - ५२, अमरावती - ४५, नागपूर - ५५.

### मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांत

एकूण ४८ नगरपालिका आणि ११ नगरपंचायत आहेत. तर, संभाजीनगर, लातूर या दोन महापालिकांसाठी निवडणुका होणार आहे. त्यात, सर्वप्रथम नगरपालिका आणि जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुका संपन्न होणार आहेत. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की, मुदत संपलेल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पूर्वी पूर्ण करणे बंधनकारक आहे. या पार्श्र्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगावर आता वेळेचे बंधन आले असून, निवडणुकीच्या तारखांची घोषणा होण्याची शक्यता आज सर्वाधिक मानली जात आहे.

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नगरपरिषद : ०५**

गंगापूर नगरपरिषद, कन्नड नगरपरिषद , खुल्ताबाद नगरपरिषद , पैठण नगरपरिषद , वैजापूर नगरपरिषद, छत्रपती संभाजीनगर.

**जिल्ह्यातील नगरपंचायत : ०१**

फुलंब्री नगरपंचायत

**बीड जिल्ह्यातील नगरपरिषद ०६**

बीड नगरपरिषद , गेवराई नगरपरिषद, धारूर नगरपरिषद, परळी-वैजनाथ नगरपरिषद, माजलगाव नगरपरिषद , अंबाजोगाई नगरपरिषद.

**जालना जिल्ह्यातील नगरपरिषद ०३**

अंबड नगरपरिषद, भोकरदन नगरपरिषद, परतूर नगरपरिषद.

**जालना जिल्ह्यातील नगरपंचायत ०४**

घनसावंगी नगरपंचायत, तिर्थपुरी नगरपंचायत, मंठा नगरपंचायत, बदनापूर नगरपंचायत.

**परभणी जिल्ह्यातील नगरपरिषद ०७**

गंगाखेड नगरपरिषद, जिंतूर नगरपरिषद, मानवत नगरपरिषद, पाथरी नगरपरिषद, पूर्णा नगरपरिषद, सेलू नगरपरिषद, सोनपेठ नगरपरिषद.

**हिंगोली जिल्ह्यातील नगरपरिषद ०३**

हिंगोली नगरपरिषद, कळमनुरी नगरपरिषद, वसमत नगरपरिषद.

**लातूर जिल्ह्यातील नगरपरिषद ०४**

अहमदपूर नगरपरिषद, औसा नगरपरिषद , निलंगा नगरपरिषद नगरपरिषद , उदगीर नगरपरिषद नगरपरिषद.

**लातूर जिल्ह्यातील नगरपंचायत ०५**

चाकूर नगरपंचायत नगरपंचायत, देओणी नगरपंचायत नगरपंचायत , जळकोट नगरपंचायत नगरपंचायत , रेणापूर नगरपंचायत नगरपंचायत , शिरुर अनंतपाल नगरपंचायत.

**धाराशिव जिल्ह्यातील नगरपरिषद ०८**

धाराशिव नगरपरिषद, तुळजापूर नगरपरिषद, उमरगा नगरपरिषद, मुरूम नगरपरिषद, कळंब नगरपरिषद, भुम नगरपरिषद, परंडा नगरपरिषद, नळदुर्ग नगरपरिषद.

**नांदेड जिल्ह्यातील नगरपरिषद १२**

किनवट नगरपरिषद, भोकर नगरपरिषद, हदगाव नगरपरिषद, उमरी नगरपरिषद, धर्माबाद नगरपरिषद, बिलोली नगरपरिषद, मुखेड नगरपरिषद, देगलूर नगरपरिषद, लोहा नगरपरिषद, कंधार नगरपरिषद, मुदखेड नगरपरिषद, कुंडलवाडी नगरपरिषद नांदेड

**जिल्ह्यातील नगरपंचायत : ०१**

हिमायतनगर नगरपंचायत.

### तुकाराम मुंढे यांचा मोठा

योग्य ठरवलेल्या पदांवर पदोन्नतीमध्ये ४ टक्के आरक्षण निश्चित केले आहे आणि दिनांक २९ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीमधील दिव्यांगांचे आरक्षण दिनांक ३० जून, २०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत नियम २०१७ च्या नियम १४ अन्वये प्रत्येक शासकीय आस्थापनाने दिव्यांग कर्मचाऱ्यांची माहिती फॉर्म ३मध्ये ठेवण्याबाबत अनिवार्य केले आहे. त्यानुसार राज्यातील प्रत्येक शासकीय, निमशासकीय आस्थापनेने दिव्यांग कर्मचाऱ्याची माहिती विहित नमुन्यात ठेवण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर, सर्व मंत्रालयीन विभाग, तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व आस्थापना, विभागप्रमुख, कार्यालयप्रमुख, तसेच स्वायत्त संस्था यांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांची माहिती तयार करून त्यांच्या विभागाच्या संकेतस्थळावर दर वर्षी १ जानेवारी रोजी प्रकाशित करणे अनिवार्य करण्यात येत आहे. सर्व प्रशासकीय विभाग, सर्व विभागप्रमुखांनी दिव्यांगांसाठी असलेल्या रिक्त पदांचा सहामाही आढावा घेणे आवश्यक आहे. आढाव्याअंती अनुशेष भरण्याची आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

तसेच सर्व मंत्रालयीन विभागप्रमुखांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांची माहिती दिव्यांग कल्याण आयुक्तांना दर वर्षी १ जानेवारी रोजी उपलब्ध करून देऊन त्याची प्रत विभागाला सादर करायची आहे. दिव्यांग कल्याण आयुक्त हे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ८३ अन्वये तयार करण्यात येणाऱ्या वार्षिक अहवालात सर्व विभागांच्या प्रशासकीय विभागनिहाय दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या माहितीचा अंतर्भाव करतील. त्यामुळे दिव्यांग कर्मचाऱ्यांबाबतची माहिती सादर न केल्यास दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ८९ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# दुबार मतदारांवरून राजकीय वाद पेटला; गायकवाड म्हणाले, "काँग्रेस-आघाडीलाच होणार फायदा"

## आमदार संजय गायकवाडांचे मोठे आरोप : मतदार यादीत हजारो 'दुबार/डुप्लिकेट' नावे, निवडणूक आयोगावर हल्लाबोल

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शिवसेना (शिंदे गट) आमदार संजय गायकवाड यांनी बुलढाणा नगरपालिकेच्या निवडणूक यादीबाबत धक्कादायक आरोप केले आहेत. त्यांनी म्हटले की एकट्या बुलढाणा शहरात सुमारे ८००० दुबार (डुप्लिकेट) मतदारांची नावे आहेत आणि त्यापैकी अंदाजे ४००० नावे 'बोगस' किंवा आहेत; त्यामुळे निवडणुका पारदर्शक होत नाहीत व चुकीच्या यादीमुळे निकालावर परिणाम होऊ शकतो.

आमदार गायकवाड यांच्या मते, त्या नावे हे फक्त एका फाईलमध्ये नोंदलेली नाहीत, तर एका व्यक्तीचे नाव अनेक भागांच्या (भाग क्रमांक) यादीत दोन-तीन ठिकाणी आढळते उदाहरणार्थ एखाद्या व्यक्तीचे नाव ५२१ या क्रमांकाखाली आहे आणि त्याचाच नाव २७५ या क्रमांकाखाली देखील आढळते. त्यामुळे जर अशा नावे मतदान करू शकली तर ज्या उमेदवाराला विजय मिळतो तो प्रत्यक्षात चुकीच्या मतांवर अवलंबून जिंकावा लागेल, असा इशारा ते देतात. ते म्हणाले की हे नावे ''डिलीट'' करावी; आवश्यक असेल तर त्यावर हमीपत्राची मागणी करावी.

गायकवाडने निवडकांवर टीका करत म्हणाले की निवडणूक जाहीर झाल्यानंतर अपेक्षा होती की दुबार नावे आधीच काढली जातील; मात्र अशी कामे पुढे ढकलण्यात आली आणि शहरी मतदार यादीचे काम अर्धवट राहिले. त्यांनी निर्दशने केल्या की मागील निकाल अल्पमताने ठरलेले आहेत ''आमची शीट फक्त ८० मतांनी पडली आहे'' असेही त्यांनी सांगितले आणि यामुळेही दुरुस्तीची आवश्यकता अधिक असल्याचे नमूद केले.

राजकीय परिणाम आणि प्रतिसाद गायकवाडच्या आरोपांनंतर विरोधी पक्षाने आणि महाविकास आघाडीने या प्रकरणाचा फायदा मिळवण्याचा प्रयत्न होऊ शकतो, अशी चिंता आमदारांनी व्यक्त केली; ते म्हणाले की या घडामोडींचा जास्तीत जास्त फायदा काँग्रेस आणि महाविकास आघाडीला होऊ शकतो. या आरोपांवरून स्थानिक राजकीय तापमान वाढल्याचे दिसते. त्याचबरोबर भाजप आणि इतर पक्षांनी या विषयावर आक्षेप नोंदवला किंवा प्रश्न उपस्थित केले आहेत, तसेच काही वृत्तसंस्थांनी या मुद्यावर प्रश्न उपस्थित केलेले आहेत.

**निवडणूक आयोगाकडून काय अपेक्षित?**

गायकवाड यांनी सुचवले की निवडणूक आयोगाने डुप्लिकेट नावे तपासून काढावी, आधार आणि मृत्यू प्रमाणपत्रांशी नावे लिंक करावी आणि आवश्यक असल्यास हमीपत्राद्वारे मतदानाची पद्धत ठरवावी परंतु ते पुढे म्हणाले की ''मला हमीपत्राचा पर्याय योग्य वाटत नाही'' आणि ''डबल नाव दिसले तर त्यावर फुली मारून टाका डिलीट करा'' असे ठाम मत व्यक्त केले. या मागण्यांविषयी निवडणूक आयोगाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया उपलब्ध नाही.

**स्थानीय परिणाम आणि पुढील मार्ग:**

गायकवाड यांच्या म्हणण्यानुसार,



जर खऱ्या अर्थाने नगरपालिकेतील ८००० किंवा त्याहून अधिक डुप्लिकेट नावे राहिली तर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांवर प्रश्न उपस्थित होतील; काही नेते निवडणुका पुढे ढकलण्याची मागणी करतात तर इतर राजकीय दल यावर दखल घेण्यास तयार नाहीत. मतदार यादीतील अशा अनियमित्त्यांमुळे निवडणूक प्रक्रियेवर लोकांचा आत्मविश्वास कमी होतो, आणि यामुळे प्रशासनाकडे त्वरित दुरुस्तीचे आव्हान निर्माण होते.

**काय घडले पुढे?**

स्थानीय नेते आणि प्रतिनिधींनी या आरोपांची तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे. निवडणूक आयोगाकडून याची सखोल पडताळणी, यादीतील नावे आधार किंवा इतर दस्तऐवजांशी लिंक करून सत्यापन आणि आवश्यक दुरुस्ती करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष आणि प्रशासन यांच्यातील संवाद पुढील तासांमध्ये किंवा दिवसांत अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

## ऑनलाइन शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली १ कोटी ८ लाखांची फसवणूक, सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल



**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरच्या सायबर पोलिस ठाण्यात ऑनलाइन शेअर ट्रेडिंगच्या माध्यमातून १ कोटी ८ लाख रुपयांची फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे ६१ वर्षीय व्यक्ती असून ते काँग्रेस नगर परिसरात राहतात. काही अज्ञात व्यक्तींनी इंटरनेटच्या माध्यमातून जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केली.

पोलिस सूत्रांनुसार, आरोपींनी विविध मोबाईल क्रमांक आणि बँक खात्यांच्या माध्यमातून वेगवेगळ्या तारखांना एकूण ₹१,०८,००,००० इतकी रक्कम फिर्यादीकडून घेतली. मात्र, पैसे घेतल्यानंतर ना त्यांना कोणताही नफा मिळाला, ना मूळ रक्कम परत करण्यात आली.

घटनेनंतर फिर्यादीने सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी फसवणूक आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये विविध कलमांखाली गुन्हा नोंदवला आहे.

सध्या पोलिसांनी ७८ मोबाईल धारक आणि बँक खाते धारकांना संशयित मानले असून, विशेष तपास पथक या सायबर फसवणुकीच्या जाळ्याचा मागोवा घेण्यासाठी तांत्रिक तपास करत आहे.

सायबर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की कोणत्याही ऑनलाइन गुंतवणूक किंवा शेअर ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवर पूर्ण चौकशी न करता पैसे गुंतवू नयेत आणि कोणत्याही संशयास्पद लिंक किंवा फोन कॉलपासून सावध राहावे.

## होमग्राउंडवर काकांविरोधात अजित पवार मोठा डाव टाकणार, बारामती नगराध्यक्ष निवडणुकीचा उमेदवार ठरला?

**बारामती-पुणे/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची लगबग सुरू झाली असून स्थानिक पातळीवरील समीकरणे जुळवण्यावर सगळेच भर देत आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर होर्णाया या निवडणुकांसाठी सगळ्याच पक्षांनी जोर लावला आहे. बारामतीमध्येही चुरस रंगणार असून उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपले काका ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याविरोधात मोठा डाव टाकण्याच्या तयारीत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर बारामतीची निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची झाली आहे. लोकसभा, विधानसभेनंतर आता नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. नगराध्यक्षपदाची निवडणूक थेट होत असल्याने आता अजित पवार म ोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याचे म्हटले जात आहे.

अजित पवार टाकणार मोठा डाव?

बारामती नगर परिषद निवडणुकीची रंगत वाढत असताना, नगराध्यक्षपदासाठी जय पवार यांच्या नावाची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे. जय पवार उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे चिरंजीव आहेत.स्थानिक स्तरावर राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये याबाबत कुजबुज सुरू आहे. जय पवार निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यास पवार कुटुंबातील आणखी एक सदस्य राजकारणात उतरणार आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, बारामती नगर परिषदेतील इच्छुक उमेदवारांची यादी तयार करण्यात आली असून, उपमुख्यमंत्री अजित पवार लवकरच या सर्व इच्छुकांशी व्यक्तिगत चर्चा करणार आहेत. या चर्चेनंतरच उमेदवारांची अंतिम यादी निश्चित केली जाण्याची शक्यता आहे.

## उद्या जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** युवकांचा सर्वागिण विकास व्हावा, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागावे यासाठी युवा कार्यक्रम, खेळ मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. सन २०२५-२०२६ वर्षांतील जिल्हास्तर युवा महोत्सव गुरुवार दि. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बुलढाणा येथील बहुद्देशिल हॉल येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर यांनी दिली आहे.

जिल्हास्तर युवा महोत्सवांत संकल्पना आधारीत स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम (यात समुह लोकनृत्य, समुह लोकगीत) कौशल्य विकास कार्यक्रम (यात कथालेखन, चित्रकला वकृत्व, कवितालेखन), विज्ञान प्रदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हास्तर युवा महोत्सवांत प्राविण्य प्राप्त केलेला संघ, युवा कलाकार यांना त्यांनी प्राविण्य प्राप्त केल्यानुसार विभागस्तरावर आपली कला सादर करण्याची संधी मिळेल. त्यानुसार विभागावर प्राविण्य प्राप्त झाल्यास राज्यस्तरावर व राज्यस्तरावरुन प्राविण्य प्राप्त केल्यास राष्ट्रीय युवा महोत्सवांत सहभागी होण्याची संधी प्राप्त होणार आहे. तसेच प्रत्येक स्तरावर प्राविण्य प्राप्त झाल्यास शासना कडुन प्राविण्य प्राप्त युवा कलाकार युवा संघ यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र, मोमेन्टो देण्यात येईल.

युवा महोत्सवांत १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभागी होवु शकतील(दि.१२ जानेवारी २०२६ या दिनांक रोजी वयाची परिगणना १५ ते २९ असावी), जन्म तारखेबाबत सबळ पुरावा म्हणुन जन्माचा दाखला जोडणे आवश्यक आहे. त्यानुसार आपल्या अधिपत्याखालील महाविद्यालय/विद्यालय/मंडळ यांना जिल्हास्तर युवा महोत्सवात सहभागी होण्याकरीता आपल्या स्तरावरुन अवगत करुन १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती यांना सहभागी होण्याबाबत आदेशित करुन सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रवेश अर्ज व ओळखपत्र जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे किंवा dsobld@gmail.com या मेलवर जमा करावी. अधिक माहीतीसाठी क्रीडा अधिकारी आर. आर. धारपवार (९९७०१ १८७९७) यांच्याशी संपर्क साधावा.

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा

### - 'दक्षता आपली सामायिक जबाबदारी' संकल्पना - भ्रष्टाचाराची माहिती देण्याचे आवाहन ; संपर्क क्रमांक जारी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलढाणाच्या वतीने दिनांक २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीमध्ये जिल्ह्यात विविध ठिकाणी कार्यकमांचे आयोजन करुन जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहाची ''दक्षता आपली सामायिक जबाबदारी'' हि संकल्पना ठेवण्यात आली होती.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा घटकाचे वतीने दिनांक २७.१०.२०२५ ते दिनांक ०२. ११.२०२५ पावेतो भ्रष्टाचार निर्मुलन संदर्भाने दक्षता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते, दक्षता सप्ताह दरम्यान ला.प्र.वि बुलढाणा घटकाकडून बुलढाणा येथील बस स्थानक, प्रशासकीय ईमारत, शासकीय व निमशासकीय कार्यालय येथे जनजागृतीची पत्रके लावण्यात आली, ला.प्र.वि.चे ब्रिदवाक्य असलेले बॅनर लावुन व हस्तपत्रके वाटप करुन जनतेमध्ये भ्रष्टाचार बाबत जनजागृती करण्यात आली.

एफएम सुरभी रेडीओ यावर भ्रष्टाचार निर्मुलन संबधाने नागरीकांना सरकारी कामाबद्दल जर कोणी लाच मागत असेल किंवा लाच मागण्याच्या उद्देशाने सरकारी काम विनाकारण अडवून ठेवत असेल तर विभागाच्या टोल फ्री कमांक १०६४, व्हॉट्सअॅप क्रमांक ९४०५०९१०६४ यावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या सप्ताहादरम्यान ३१ ऑक्टोबर रोजी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती दिनानिमित्त ''राष्ट्रीय एकता दिवस'' म्हणून शपथ घेण्यात आली.

बुलढाणा शहरामध्ये बसस्थानक, जयस्तंभ चौक, कारंजा चौक या गर्दीचे ठिकाणी भ्रष्टाचार निर्मुलन संबंधी शाहीर डी. आर. इंगळे व त्यांचे सहकारी यांचे पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. तसेच जनजागृती संबंधाने मराठी अभिनेते विजय पाटकर, सचिन गोस्वामी, श्याम राजपुत तसेच यु ट्युबर धनश्री पाटील, श्वेता महाजन यांच्या चित्रफितीद्वारे आवाहन प्रदर्शित करण्यात आले. तसेच सोशल मिडीयाद्वारे जनजागृतीपर व्हीडीओ, पोष्टर्स, बॅनर व जनजागृतीचे फोटो प्रसारीत करुन जनजागृती करण्यात आली.

जनतेमध्ये भ्रष्टाचार विरोधी जनजागृती करण्याच्या उद्देशाने भ्रष्टाचारासंबंधी माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचारी लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. त्यानुसार पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रबिंधक विभाग, बुलढाणा यांच्या कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२५४८, टोल फ्री. १०६४ किंवा व्हाट्स अॅप कमांक ९४०५०९१०६४ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक भागोजी चोरमले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. ०००

## विविध वृत्त...

### जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक अंतिम आरक्षण जाहीर

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ३ नोव्हेंबर रोजी अंतिम आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही अधिसूचना जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार बुलढाणा जिल्हा परिषदेतील आरक्षित निवडणूक विभागांची जाहीर सोडत १३ ऑक्टोबर रोजी काढण्यात आली होती. त्यानंतर निवडणूक विभागनिहाय आरक्षण प्रसिद्ध करुन त्यावर १४ ते १७ ऑक्टोबर या कालावधीत हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त हरकती व सुचनांवरील सुनावणी घेवून आरक्षणास विभागीय आयुक्तांची घेण्यात आली. त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी बुलढाणा जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक आरक्षणाची अधिसूचना जारी केली आहे.

सदर अधिसूचना ही जिल्हा परिषद कार्यालय, सर्व तहसिल कार्यालये, पंचायत समिती कार्यालयांच्या सूचना फलकांवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

### देऊळगाव राजा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शुक्रवारी वंदे मातरम गित गायन कार्यक्रम

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबईच्या विद्यमाने देऊळगाव राजा औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या वतीने शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर२०२५ रोजी दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय देऊळगाव राजा जि. बुलढाणा येथे सकाळी ९.३० वाजता वंदे मातरम गित गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन देऊळगाव राजा औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे प्र. प्राचार्य एस. डी. नागरे यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार मनोजभाऊ कायंदे यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच तहसीलदार वैशाली डोगरजाळ, स्थनिक परिसरातील प्रशासकिय अधिकारी, शाळा/महाविद्यालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.

### आधारभुत किंमत योजना; मुंग, उडिद व सोयाबिन खरेदीसाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या आधारभुत किंमत योजनेंतर्गत सन २०२५-२६ वर्षीच्या हंगामामध्ये हमी दरात मुंग, उडिद व सोयाबिन खरेदीकरीता दि. ३० नोव्हेंबर २०२५ पासून नोंदणी सुरु होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह खरेंदी केंद्रावर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी एस.डी.गावंडे यांनी केले आहे.जिल्ह्यामध्ये मुंग, उडिद व सोयाबिन खरेदीसाठी बुलढाणा जिल्ह्यातील या कार्यालयअंतर्गत तालुका शेतकी सहकारी खरेदी विक्री समिती मर्या. बुलढाणा, मेहकर, लोणार, संग्रामपूर, शेगांव व स्वराज्य शेतीपुरक सहकारी संस्था, चिखली अशी सहा खरेदी केंद्रांवर नोंदणी सुरु करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. शेतकऱ्यांनी नोदंणीसाठी आधारकार्ड, सातबारा ऑनलाईन पिकपेरासह, बँक पासबुकची आधारलिंक केलेली झेरॉक्स. व मोबाईल क्रमांक इत्यादी कागदपत्रांसह संबंधीत खरेदी केंद्रावर जाऊन मुंग, उडिद व सोयाबिन खरेदीकरीता नोंदणी करावी, असे आवाहण करण्यात आले आहे.

### निवडणुकांच्या अनुषंगाने न्यायालयात सुनावणी; हायकोर्टाने मतदार यादीसंदर्भातील चारही याचिका फेटाळल्या

**मुंबई/प्रतिनिधी :** एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद होत असून दुसरीकडे निवडणूक मतदार यादीतील घोळांवरुन राजकीय वातावरण तापलं आहे. त्याच अनुषंगाने उच्च न्यायालयात दाखल याचिकांवर आज सुनावणी संपन्न झाली. न्यायालयात दाखल एकूण ४२ याचिकांपैकी ४ याचिका फेटाळण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, म तदार यादीच्या ड्राफ्टवर आक्षेप घेण्यास कमी अवधी मिळाल्यासंदर्भातही याचिका दाखल करण्यात आली होती.मतदार यादीच्या ड्राफ्टवर आक्षेप घेण्यास मि ळालेला कमी अवधी, ऑनलाइन अर्ज करुन देखील यादीत नाव नसणे आणि मतदार यादीतील नाव ट्रान्सफर करण्याची मागणी करणाऱ्या चारही याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. मतदार यादीविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर न्यायालयात आज सुनावणी पार पडली, तर आरक्षण आणि सीमांकन संदर्भातील याचिकांवर गुरुवारी सुनावणी होणार आहे.